# डॉ. श्रीकृष्ण जोशी - अल्प परिचय

शैक्षणिक -एम्.ए.बी.एड्., पीएच.डी. मराठीचे अध्यापन, 'प्रभाकर पाध्ये यांच्या ललित साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएचडी. वास्तव्य- रत्नागिरी

प्रकाशित साहित्य- कादंबरी- शेंबी, घसरण, महाराज, घर दोघांचे, अगतिक, नंतर, शल्य, शापित, तुझ्याशिवाय, काटशह, कातळ, अथांग, मार्शिलँड, समांतर, वादळवेणा, भोवरा, ब्रेकींग न्यूज. दीर्घ कथासंग्रह- रानोमाळ, रानवा. सगीत नाटक- सं. शांतिब्रह्म, सं घन अमृताचा. सं. राधामानस, सं. ऐश्वर्यवती, सं. ऋणानुबंध, सं. स्वरयात्री. नाटक- चिन्नुच घर, स्वप्नपक्षी अरे चल चल. काव्य संग्रह - खडुचे अभंग, कथासंग्रह- ड्रॉवर, ललितलेख, रौद्रलेणी, पडघम

बालवाङ्मय- अपूर्वा, गोष्टीरुप चाणक्य, सरदार वल्लभभाई पटेल

वरील साहित्यामधील खडुचे अभंग हा काव्यसंग्रह असून त्यामध्ये १०१ अभंग आहेत ते क्रमशः प्रसिद्ध करू. पहिले काही अभंग खालीलप्रमाणे आहेत.

**एक**

वेडे वाकुडाले। लिहितो कशाला।
बिचाऱ्या खडूला। पुसे कोणी।।
काया झिजविणे। तुझा नेम धर्म।
इतुकेच कर्म। भाळी तुझ्या।।
हव्या कशाला त्या। नसत्या उचापती।
करावी बां वांती। एकदाची।।
एवढासा तुझा। जीव नाजुकसा।
पडेल का ठसा। जगावरी।।
ठावकी मजला। आहे मी खेळणे।
देह समर्पिणे। खडू म्हणे।।

- खडूचे जगणे आणि शिक्षकाचे जगणे यांत साम्य आहेच. दोन्ही संपल्यावर अस्तिवच रहात नाही.

**दोन**

आवड निवड। बया जन्मा आल्या।
जन्मताच मेल्या। आई संगे।।
सुखाची शिदोरी। हवी होती बापा।
भलत्याच तापा। गुंतियेला।।
शुभ्र वाटेवरी। कापसाची गादी।
भलतीचे मादी। हक्क सांगे।।
तिचिया शब्दाला। जगी होते मोल।
परि जाय फोल। बाप यत्न।।
सांगावी कुणाला। बापाची कहाणी।
डोळा नुसते पाणी। खडू म्हणे-

- त्यागातून उभ्या राहिलेल्या शिक्षण संस्थांना संस्थानाचे रुप केंव्हा येते आणि भोगासाठी त्याचा वापर केंव्हा सुरू होतो हे अनेकांना कळत नाही. ज्यांना कळते तेंव्हा त्यांच्या फक्त आधाराला डोळ्यातले पाणी उरते, जे केवळ वाहून जाते. तहान भागवण्यासाठी त्याचा उपयोग कधीच होत नाही.

**।। तीन।।**

सुरवंटी जग। पानोपानी हाले।
मनामध्ये झुले। रोमांचाचे।।
हले झुले फांदी। भूक जागी झाली
पान झाले जाळी। अगतीक।।
सुरवंटी भूक। भलती खादाड।
झाडाचे ही खोड। प्रिय तिला।।
हादरे उभ्याने। शेजारचे झाड।
सुरवंटी धाड। पाहोनिया।।
ऐसा महिमा। वर्तमानी घडे।
सर्वांनाच धडे। खडू म्हणे।।

- एखाद्या घटकाला किती जणांनी शोषून घ्यावे याला मर्यादा असतात. पण शिक्षण घटकाला शोषणारे अमर्याद असतात. परिणामी बलात्कारितेच्या वाट्याला येणारे भोग शिक्षणक्षेत्राच्या वाट्याला येतात.

**।। चार।।**

अगा पांडुरंगा। कोठे बैसलासी।
मुमुक्ष दारासी। तिष्ठियेला।।
कुलुपाचे भान। दाराला नसावे।
कैसे हे सांगावे। बिचाऱ्याला।।
ओंजळ उघडी। पाण्याची तहान।
भांडे ही लहान। आर्ताळले।।
अगा पांडुरंगा। उघडी का दार।।
मुमुक्षुची हार। उरलेली।।
फळा भिंतीवरी। पुस्तक बाजारी।
रीत नाही बरी। खडू म्हणे।।

- ज्ञानोत्सुकांनी आता केवळ तहानलेल रहाव. आताशा पाणपोयातून पाणी मिळत नाही किंवा जे मिळत त्यालाच पाणी म्हणाव...समाधान करून घ्याव.

**।। पाच।।**

म्हणाले अतिथी। इथे स्कूल बांधा।
तिथे मूळ 'बांधा'। हर्षभरे।।
असा रंग लावा। उजेडासमान।
शोभेची कमान। हवीच ती।।
हवी एक पाटी। भली थोरली ती।
जनलोक येती। पहाण्या।।
जाणारे येणारे। कौतुक पाहती।
म्हणे थोर किती। दानशूर।।
आरंभी वंदावे। अशा दातृत्वाला।
वाव कर्तृत्वाला (!) खडू म्हणे।।

- शाळा म्हणजे- एक प्रदर्शनीय वस्तू- असलेल्या नसलेल्या मोठेपणाची साक्ष. - पापक्षालनार्थ बांधलेला घाट - आणि टाळ्या वाजवण्यासाठी मुलांचा गोठा.